# प्रकरण चौथे

# 'सुगरणचा खोपा' या पुस्तकाचा परिचय व वाङ्‌मयीन मूल्यमापन

पृष्ठ - ५२ ते ८२

# प्रकरण चौथे
# 'सुगरणचा खोपा' या पुस्तकाचा परिचय व वाङ्मयीन मूल्यमापन

**प्रस्तावना :-**

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रामध्ये पु.भा. भावे, वामन चोरघडे हे वऱ्हाडी कथाकार म्हणून ओळखले जातात. यातीलच एक वऱ्हाडी कथालेखिका म्हणजे डॉ. सौ. प्रतिमा इंगोले ह्या होय. त्या एक उत्कृष्ट कथाकथनकार म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या वऱ्हाडी बोलीभाषेतील जिव्हाळा, ओलावा त्यांच्या कथा वाचल्यानंतर जाणवतो. त्यांनी ग्रामीण जीवनाचं फार जवळून निरीक्षण केल्यामुळे त्यांच्या कथा सकस झाल्या आहेत. डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांचे वास्तव्य अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर या ठिकाणी असून त्यांचे अनेक कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांना एकूण २१ वाङ्मय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्या मराठीतील एक नावाजलेल्या कथालेखिका आहेत.

'डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांच्या कथाकादंबरीतून वैदर्भीय जीवनाचे, परिसराचे, पर्यावरणाचे जसे दर्शन घडते तसेच वैदर्भीय माणसाचे जगणेही मुखरित होत असते. ग्रामीण जीवनातील ताणतणाव, एकत्र कुटुंबातील स्त्रीची घुसमट, पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांच्या मनाचा होणारा कोंडमारा, नव्या नवरीच्या आगमनाने घर, अंगण आणि परसबागेत ओसंडून वाहणारा आनंद असे ऊन-सावलीचे दर्शन प्रतिमा इंगोले यांच्या कथात्म साहित्यातून घडत असते. शेतकरी जीवनाचे दर्शन, गावाकडची माणसं यांचे रम्यदर्शन इंगोले यांच्या कथाकादंबरीतून घडत असते. वैदर्भीय लोकजीवन, खेड्यापाड्यातील तरूणांची शिक्षणासाठी चालू असलेली धडपड, मुलांच्या येण्याकडे डोळे लावून असलेल्या आसुसलेल्या स्त्रिया आणि भरभरून खाऊपिऊ घालणाऱ्या घरंदाज गृहीणी यांनी प्रतिमा इंगोले यांचे साहित्यविश्व गजबजलेले आहे. वऱ्हाडी

बोली, तिच्यातील म्हणी, वाक्प्रचार, विशिष्ट शब्द संकेत आणि वऱ्हाडी बोलीचे विशेष प्रतिमा इंगोले यांच्या साहित्यातून व्यक्त होतात.'[१]

प्रतिमा इंगोले वऱ्हाडच्या मातीत लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यामुळे त्यांनी तेथील माणूस फार जवळून पाहिला होता आणि अनुभवला होता. त्यामुळेच त्यांनी अतिशय संवेदनाक्षम मनाने आपल्या भोवतालचे वातावरण टिपून घेतले होते. इंगोलेंना ग्रामीण भागाविषयी ओढ आहे. त्यामुळेच त्यांना विविध विषय जाणवले असावेत आणि त्यातूनच त्यांच्या कथांचा जन्म झाला असावा. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे वास्तव, त्यातील विविध प्रश्न, ताणतणाव हेच त्यांच्या लेखनाचे प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या एकूणच लेखनात मन:पूर्वकता भरून आलेली दिसते.

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांचा 'सुगरणचा खोपा' हा एक लोकप्रिय कथासंग्रह आहे. त्यात त्यांनी वऱ्हाडी भाषेचा वापर करून तेथील लोकांचे जीवन, राहणीमान, दर्जा यांचे चित्रण केले आहे. त्यांचे सुख-दु:ख, भाव-भावना मुखरित केल्या आहेत. त्यांच्या या कथासंग्रहाला शकुंतला जोग पुरस्कार आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचा गोखले पुरस्कार प्राप्त झाला आहे.

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरनचा खोपा' कथासंग्रहात एकूण नऊ कथा आहेत. त्या म्हणजे 'बिऱ्हाड', 'पेरणारे हात', 'लंगडा', 'भिंगरी', 'सुगरनचा खोपा', 'भोवांडा', 'धुईधानी', 'मावळती' व 'इनवासे' ह्या होत. हा कथासंग्रह १०४ पृष्ठांचा आहे. प्रतिमा इंगोले यांच्या कथांचा परिचय पुढील प्रमाणे :-

**१) बिऱ्हाड :-**

प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरनचा खोपा' कथासंग्रहातील 'बिऱ्हाड' ही पहिलीच कथा असून या कथेची नायिका पंचफुला ही आहे. या कथेतील पंचफुला व तिचा नवरा हे दोघेही आपलं इचवाचं बिऱ्हाड पाठीवर घेऊन फिरत राहातात. परंतु त्यांना कुठेही एका ठिकाणी कायमस्वरूपी राहण्यासाठी जागा मिळत नाही. त्यांची सारखी वाताहत होत राहते. वय झाले असूनही त्यांना चार घास सुखाचे खाता येत नाहीत. पंचफुलाला

दोन मुली व एक मुलगा आहे. दोन्ही मुलींची लग्ने लावून दिली तसेच मुलाचेही लग्न लावून दिले पण सून आल्यानंतर मुलगा दारू प्यायला लागला आणि वडिलांच्या जीवावर उठला. त्यामुळे त्यांनी आपलं अमरावतीतील वडाळीचे घर सोडले आणि उघड्यावर आले. प्रथम ते डॉक्टरांच्या येथे बीमवर राहतात. पंचफुला त्या चौकोनी जागेत आपला संसार थाटते. काही दिवस होताच तिथल्या शेजारणीचा डबा गायब होतो आणि ती पंचफुलावर आळ घेते म्हणून पंचफुला तिथून दुसऱ्या ठिकाणी जाते.पंचफुला आपलं बिऱ्हाड दर वेळेला नव्या जोमाने थाटते पण काहीतरी कारणावरून तिचं बिऱ्हाड दर वेळेला विंचवाच्या बिऱ्हाडागत पाठीवर राहतेच. पंचफुला व तिचा नवरा आपल्या बहिणीकडे आश्रयाला जातात. तिथूनही त्यांना भर उन्हात हाकलून लावतात. नंतर ती शेतात झोपडी करून राहतात. परंतु पावसाळ्यात शेत पेरायचं म्हणून शेतमालकाने त्यांना हाकलून लावलं नंतर स्टेशनमास्तरनं हाकललं नंतर पंचफुला कॉलनीचे अध्यक्ष व डॉक्टरांच्याकडे धुणी-भांडी करण्यास जाऊ लागली. डॉक्टरसाहेबांनी तिला रहायला जागा दिली. पंचफुलाला मात्र तिच्या कामाच्या मोबदल्यात काहीच मिळत नसे. म्हणून ती दुसऱ्यांच्या घरी धुणी-भांडी करायला जाऊ लागली. डॉक्टरसाहेबांना ते आवडेनासे झाले त्यांनी तिला आपल्या जागेतून जाण्यास सांगितले. तेव्हा पंचफुला आपलं बिऱ्हाड घेऊन अजून कोणीच प्लॉट विकत घेतले नव्हते त्या ठिकाणी जाऊन राहिली कारण वर्षभर तरी तिला कोणी हाकलणार नव्हते.

प्रतिमा इंगोले यांनी या कथेला दिलेले 'बिऱ्हाड' हे शीर्षक अतिशय समर्पक आहे.

**२) पेरणारे हात :-**

'सुगरनचा खोपा' कथासंग्रहातील ही दुसरी कथा आहे. शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले जीवन, समाजात चाललेला भ्रष्टाचार याचे चित्रण या कथेत केले आहे. 'पेरणारे हात' हे कथेला दिलेले शीर्षक समर्पक आहे. या कथेचा नायक गुणवंतराव हा शेतकरी आहे. त्याने अमरावतीतील एका सावकाराचे शेत लागवडीसाठी तीन वर्षासाठी

सावकाराच्या सांगण्यावरून घेतले. दोन वर्ष गुणवंतरावाने पैसे देऊन शेत पेरले, तिसऱ्या वर्षीही पैसे दिले, शेत पेरले, कास्तकारी केली. पहिल्यांदा हायब्रीड पेरले. परंतु हायब्रीड काढायच्या वेळेत त्या सावकाराने गावातील दुसऱ्या सावकाराला शेत विकलं. ज्या दिवशी गुणवंतराव शेतात खुडायला गेला त्याचवेळी सावकार तेथे आला आणि हे शेत मी खरेदी केले आहे, तर हे वावर मी खुडतो. गुणवंतरावाने शेत पेरले तर त्यानेच त्यातील पीक घेतले पाहिजे पण सावकाराचा न्याय वेगळाच. शेतकऱ्याने कितीही कष्ट केले तरी त्याच्या मालाला बाजारात भाव मिळत नाही. ज्याच्याकडे पैसे असतात तो साहेबांना पैसे चारून स्वत:ला पाहिजे तसा निकाल लावून घेतो. शेतकऱ्याने कितीही कष्ट केले तरी त्याच्या पिकावर त्याचा हक्क राहत नाही.

गुणवंतरावाने पेरलेले व कसलेले उभे पीक धोक्यात सापडते म्हणून तो न्याय मिळवण्यासाठी वकिलाकडे येतो पण वकील तरी त्याला न्याय देऊ शकेल काय? पेरणारे हातच जर जायबंदी केले जात असतील, पेरणाराच उपाशी रहात असेल, ज्याच्या घामातून तरारून आलेला घास त्याच्याच मुखी पडत नसेल तर तो कंटाळून पेरण्याचा व्यवसाय सोडून देईल. उलट पेरणाऱ्या हाताला प्रोत्साहित करायला हवं, त्यांचा सन्मान करायला हवा पण तसं होत नाही. उलट पेरणारे हातच नागवले जातात, कलम केले जातात पण आता तरी त्याला, त्या हातांना न्याय मिळेल का?.....

**३) लंगडा :-**

'सुगरनचा खोपा' कथासंग्रहातील 'लंगडा' ही तिसरी कथा आहे. मुक्या प्राण्यांनाही भावना असतात. त्यांचे स्वत:चे असे विश्व असते. परंतु आपल्यासारखी माणसेसुध्दा या मुक्या प्राण्यांशी क्रूरतेने वागतात. त्यांचा काहीही दोष नसताना त्यांचा बळी घेतला जातो. 'लंगडा' कथेतील घोड्याचे पिलू आणि त्याची आई या मुक्या प्राण्यांच्या ज्या भावना शब्दबध्द केल्या आहेत त्या अंत:करणाला भिडून जातात. त्यांच्या मालकाचं गावातल्या दुसऱ्या माणसाशी भांडण झालं होतं व त्या भांडणाच्या कामासाठी मालक गावाला गेले होते. मालक नाहीत असे पाहून मालकाचे शत्रू मळ्यात

घुसले आणि छोट्या घोड्याचे पिलू मालकाने डांबाला चांगलेच बांधून ठेवले होते. त्या घुसणाऱ्या साऱ्या माणसांनी त्याच्याशिवाय काहीच सापडलं नाही म्हणून सारा राग त्या घोड्याच्या पिलावर काढला, त्याला रक्तबंबाळ केले, त्याचे पाय लुळे केले आणि मारता मारता थकून शत्रू निघून गेले. वास्तविक पाहता त्या घोड्याच्या पिलाचा काय संबंध? त्या लोकांनी असहाय्य पिलावर अत्याचार का करावा? त्यांना असा कुठला आनंद मिळाला असेल? मात्र शेवटी त्या घोड्याच्या पिलाचे दोन्ही पायांचे हाड बाहेर आल्यामुळे कापून काढावे लागले. त्याच्या खेळाच्या, फिरायच्या, खायच्या वयातच त्याच्यावर असा अमानुष प्रसंग आला तोही ह्या क्रूर लोकांमुळेच. मुक्या जनावरांना त्रास देऊन त्यांना काय मिळत असेल कोणाला माहीत?

या कथेत मुक्या जनावरांचे चित्रण करून माणसं स्वत:चा सूड उगविण्यासाठी असहाय्य प्राण्यांना कशी बळी पाडतात याचे सुरेख चित्रण या कथेत केले आहे.

**४) भिंगरी :-**

'सुगरनचा खोपा' कथासंग्रहातील 'भिंगरी' ही चौथी कथा असून या कथेची नायिका गंगाबाई ही आहे. गंगाबाई आपल्या सासरी घर नसल्यामुळे माहेरीच रहात होती. तिला दोन मुलगे होते. दोघांचीही लग्न झाली होती. गंगाबाईचा चुलता हा त्याची मुले मोठी झाल्यानंतर श्रीमंत होऊ लागला. थोरला मुलगा मिल्ट्रीत तर मधला मुलगा दुधाचा धंदा करीत होता. दुधाच्या धंदयामुळे तो लवकरात लवकर श्रीमंत होऊ लागला कारण तो सारा पैसा पाण्याचाच होता. गंगाबाई तेथेच चुलत्याच्या घरासमोर झोपडीत रहात होती. परंतु चुलत्याची परिस्थिती सुधारल्यानंतर त्याने माडीचे घर बांधले त्यामुळे गंगाबाईच्या झोपडीसमोर केवळ चार फूटच जागा राहिली आणि त्या जागेतही माडीवरून पडणारे पाणी सरळ त्या चार फूट जागेतच पडत होते. तसेच ते पाणी सरळ घरातही जात होते. तरीही ती काहीही बोलली नाही. परंतु तिच्या चुलत्याच्या कुत्र्याने मांजराच्या पाठीमागे लागल्यानंतर तिच्या घरावरची कौले फोडली आणि तिच्या धाकट्या मुलाच्या लहान दीड वर्षाच्या मुलीच्या कपाळावर लागले. कपाळातून रक्त

वाहू लागले. तेव्हा गंगाबाई, तिचा धाकटा मुलगा पळत आली. धाकट्या मुलाने चुलत्याचा गोतावळा आणि तिच्या तीन पिढ्यांचा सासरमाहेरचा उध्दार केला. त्यामुळे चुलत्याची मुले व चुलता पळत आली तेवढ्यात गंगाबाईने आपल्या मुलाची समजूत घालून त्याला घरात घातले आणि बाहेरून साखळी लावून घेतली. चुलत्याच्या मुलाने खुनाची धमकी दिली होती तेव्हा गंगाबाईने आपली तक्रार पोलिसस्टेशनमध्ये दाखल केली पण एकाही पोलिसाने तिचे ऐकून घेतले नाही. उलट तिलाच चार गोष्टी सुनावून मार्गी लावले. चुलत्याच्या मुलाने दिलेल्या खुनाच्या धमकीला भिऊन गंगाबाई मुलाच्या जीवनासाठी भिंगरी होऊन हिंडत होती.

अशा प्रकारे ह्या कथेत बदललेल्या समाज-व्यवस्थेचे चित्रण केले आहे. गंगाबाईच्या मनावर चिंतेचे, भीतीचे व धसक्याचे कायम सावट पडून रात्रीबेरात्री धास्तावत राहते. आजच्या ढासळलेल्या समाजव्यवस्थेमुळेच हतबलता पदरी आलेल्या वा उध्वस्त झालेल्या सामान्य व गरीब जीवांचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. गरीब अधिक गरीब होतो आहे तर श्रीमंत अधिक श्रीमंत मग्रूर होतो आहे.

**५) सुगरनचा खोपा :-**

'सुगरनचा खोपा' या कथेचा नायक गौतम हा अजाबराव पाटलांच्या घरी काम करीत होता. एके दिवशी त्याला पाटलाच्या शेतावर कामाला जायला उशीर झाला तेव्हा अजाबराव पाटलांनी गौतमला विचारले की, आज कामावर यायला उशीर का केला? गौतमने मुलगी पहायला गेलो होतो असे सांगितले. तुझं ह्यावर्षी लग्न करायचे असेल तर मुलगी आपल्या घरचीच आहे असे पाटलांनी त्याला सुचवले. मुलगी दर्यापूरला वकीलसाहेबांच्याकडे धुणी-भांडी करायला असते असे पाटलांनी गौतमला सांगितले. गौतमला त्यांच्या साऱ्या नातेवाईकांबद्दल माहिती होती. त्यांच्या नात्यातल्या सर्व स्त्रिया सुंदर होत्या. त्यामुळे मुलगी आपल्या घरीच आहे असे म्हणताच गौतमच्या मनात सुगरनचा खोपा तयार झाला. गौतमच्या आशेला पारावार उरला नाही. तो लगेच दर्यापूरला चांगले कपडे, गॉगल वगैरे घालून भाड्याची सायकल घेऊन पंखाच्या

वेगाने उडू लागला. सात डोंगर पार केल्यागत सात कोस पार करून अलगद तो दर्यापूरात आला आणि त्याच दिवशी मुलगी पाहून पसंत करून गेला. मुलीचे नांव अनपूरना असे होते. गौतमने पाटलांना येऊन मुलगी पसंत आहे असे सांगितले तेव्हा पाटलांनी पसंत आहे तर जुळवून टाकू लग्न असे म्हणताच त्याच्या मनात अभासाचा गोफ निर्माण झाला. तोच गोफ हारागत अनपूरनाच्या गळ्यात घालावासा वाटत होता. सुगरनचा खोपा मजेत झुलतच होता. वाऱ्याबरोबर हिंदकळत होता.

या कथेत गौतम लग्नासाठी उतावीळ झालेला असतो. पाटलांनी मुलगी घरचीच आहे असे सांगताच न पाहिलेली मैना त्याच्या डोक्यात सुगरनचा खोपा विणते. गौतमच्या भावभावना आणि त्याच्या माफक अपेक्षा कथेमध्ये कलात्मक रूपात व्यक्त होतात.

**६) भोवांडा :-**

'भोवांडा' कथेतील नायक शालक्या हा भुकेच्या वणव्यात वणवणतो व शेवटी मुंबईच्या गुंडागिरीची शिकार बनतो. प्रतिमा इंगोले यांनी या कथेत माणसाच्या ज्या प्राथमिक गरजा असतात त्या पूर्ण झाल्या नाहीत तर तो कसा उध्वस्त होतो, चोरी करण्याशिवाय त्याच्याकडे कोणताही पर्याय रहात नाही. तसेच वाढती लोकसंख्या आणि जमिनीचे कमी होत जाणारे क्षेत्र यामुळे गरीब अधिक गरीब होत आहे आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होतो आहे याचे चित्रण या कथेत केले आहे. माणसाला पोटभर खायला मिळाले नाही तर तो दुसऱ्याचे चोरून खातो, फक्त टीचभर पोटासाठी माणसाचे संपूर्ण आयुष्य उध्वस्त होते आणि ही संपूर्ण समाजव्यवस्थाच बदललेली आज आपल्याला दिसते.

या कथेतील परल्या व शालक्या हे दोघे बालपणापासूनचे मित्र. शालक्या व परल्या सदा भुकेलेले असायचे. जास्तीत जास्त शालक्याच भुकेलेला असायचा. कारण शालक्याच्या घरी आठवड्यातून चार दिवस तरी चुलीला काही काम नसायचे. त्याला भावंडेही खूप होती. त्यात हा सर्वात मोठा. आई एकटीच कष्ट करायची. बाप सतत

दारूच्या नशेत असायचा. त्यामुळे शालक्याने कधीच पोटभर अन्न खाल्ले नव्हते. परंतु परल्याच्या घरची परिस्थिती शालक्याच्या घरापेक्षा जरा बरी होती. पण तो ही भुकेलेलाच असे. शाळेत असताना शालक्याला भूक लागली म्हणून ते मारवाड्याच्या पेरूच्या वाडीत शिरले. मारवाड्याने त्यांना पकडण्यासाठी त्यांचा पाठलाग केला पण ते सापडले नाहीत. त्या दोघांनाही मारवाड्याचा मार माहीत होता म्हणून दोघांनीही पळून मुंबईला जायचे ठरविले. परंतु शालक्या ज्या एस.टी.त चढला त्या एस.टीत परल्याला घेतले नाही. शालक्याने पाठीमागच्या गाडीने ये असे परल्याला सांगितले. परल्या पाठीमागच्या गाडीत बसला. परंतु एस.टी.तील लोकांनी त्याला खवळून समजावून सांगितले आणि मध्येच एस.टीतून उतरविले. त्यामुळे शालक्या मुंबईला गेला आणि परल्या गावीच राहिला. आता परल्या स्वत: विकत घेतलेल्या जमिनीत कास्तकारी करतो त्याला मुलबाळं आहेत. पण शालक्याचं अजूनही लग्न झालं नाही. मुंबई ही हाडळ आहे असे तो सांगतो. तेथे पोटभर खायला मिळत नाही, रहायला जागा मिळत नाही. मुंबई श्रीमंताची आहे. आपल्यासारख्यांचे तेथे खूप हाल होतात असे शालक्या सांगतो. तसेच शालक्या लोभापायी बदमाशांच्या टोळीत अडकतो कुठल्या तरी प्रकणात टोळीच्या म्होरक्याने केलेल्या खुनाचं पाप त्याच्या माथी मारले जाते. भुकेच्या लालसेने पळालेला शालक्या जीवाच्या लालसेने गावी परत येतो. एक मोठा गरगरता भोवांडा त्याने सोबत आणला होता आणि त्यातच गरगरत होता.

अशा प्रकारे या कथेत चकाकणाऱ्या, खुणावणाऱ्या मुंबईचं चित्रण केलेले आहे. या कथेला दिलेले शीर्षक यथायोग्य आहे.

**७) धुईधानी :-**

साहेबराव हा कास्तकाराचा मुलगा. त्याला कापसाच्या शेतीची आवड होती. त्याला शेतात काम करायला खूप आवडायचं. शेतातलं प्रत्येक कापसाचं बोंड त्याच्या ओळखीचं होतं, परंतु बापाला वाटायचं की, साहेबरावांन खूप शिकावं चांगली नोकरी करावी पण साहेबरावाला शेतीचीच आवड होती. इतक्याही धामधुमीत तो मॅट्रीक झाला

आणि कापूस एकाधिकार योजनेत तोलाई कारकून म्हणून रूजू झाला. त्याचा कापसाशी संबंध तुटला नाही. म्हणून त्याला खूप आनंद झाला. दुधाची तहान ताकावर का होईना पण भागविता येणार होती. साहेबराव ज्या ठिकाणी नोकरी करीत होता त्या ठिकाणी भ्रष्टाचार चालत होता. शेतकऱ्यांच्या मालाला किंमत नव्हती. एक नंबरचा माल तीन नंबरला लावला जात होता. पण साहेबराव कष्टाचं मोल जाणत होता. आपल्याच बहिणीची इज्जत घेण्यासारखा हा व्यवहार त्याला जमू शकत नव्हता. दुनियेने पैशापेक्षा घामाला श्रेष्ठ मानायला हवं, कारण घाम गाळणारे आहेत म्हणून अन्न, वस्त्र, निवारा आहे. घामगाळणारांनी संप केला तर दुनिया ओसाड होईल. मानवाचं अस्तित्व धोक्यात येईल. म्हणून घामाची इज्जत राखली पाहिजे. श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे. आयतं खाणाऱ्यापेक्षा पिकवून खाणाऱ्याला मान दिला पाहिजे. मातीशी जर नातं आहे तर मातीच्या धनाचं मोल जाणलंच पाहिजे. तिचं सत्व राखलच पाहिजे. अधिकाऱ्यांचा व्यवहार साहेबरावाला आवडेनासा झाला पण अचानक एक दिवस त्याला धक्का बसला कारण फेडशेननीच त्याच्याविरूध्द त्यानं कापसाचे पैसे खाऊन माप वाढविले, त्यासाठी खाडाखोड केली म्हणून रिपोर्ट दिला होता व काटापट्टीवर कापसाचं मूळ माप असून यानेच फारीपट्टीवर माप वाढविल्याचं पुराव्यानिशी दाखवून दिले होते. हे सिध्द करण्यासाठी ग्रेडरसाहेब व सबझोनल साहेब अटीतटीनं सिध्द झाले. त्याच्यावर पोलिसकेस झाली. पोलिसांनी त्याला अटक केली. वडिलांनी कशीबशी जमानत घेतली पण पोलिसांनी त्यांच्यावर कोर्टात केस चालू केली आणि एकाधिकार योजनेनं त्याला भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली निलंबित केलं. तो रंगेहाथ पकडला गेला होता. शेवटी पाण्यात राहून माशांशी वैर करता येत नाही हेच खरं! साहेबरावाचं जीवन उधळलं गेलं होतं. त्याच्या आयुष्यालाच कलंक लागला होता. साहेबराव शरीरानंही वाळून कोळ होऊ लागला. अशा प्रकारे त्याच्या आयुष्याचीच धुईधानी झाली.

८) मावळती :-

'मावळती' या कथेचा नायक 'बाबासाहेब'. हा तरूणपणात गावचा आदय नेता होता. आता त्यांचे वय झाले आहे. त्यांचा मुलगा जि.प. चा सदस्य झाला होता म्हणून त्याचा गावी सत्कार पाहण्यासाठी येतात. पण त्यांच्या मनात उपेक्षितपणाची भावना दबली गेली होती. मुलाचा सत्कार करताना एखादयाने तरी आपल्या गळ्यात हार घालावा असे त्यांना वाटत होते पण आजकाल चलतीचेच ढोल सर्व वाजवतात. त्यांना कोणीही हार घातला नाही. त्या गावचे ते आदय नेते होते व त्यांच्या नेतृत्वाची बूज तरी लोकांनी राखायला हवी होती पण त्यांना कोणी विचारलेच नाही. उलट त्यांच्या मुलानेच त्यांची विचारपूस केली. भाषण सुरू झाल्यानंतर नव्यानच बदलून आलेले बी.डी.ओ. ज्याच्या त्याच्या वक्तृत्वाचा विषय ठरत होते. सर्वच लोक सत्तेभोवती फिरत होते. ज्यांची चलती आहे त्यांना बरोबर शोधून काढून त्यांचा उदो उदो करीत होते. त्या लोकांमध्ये व आपल्यामध्ये कुठेतरी दरी असल्याचं त्यांना जाणवू लागलं ते भाषण त्यांना ऐकवेना म्हणून ते सभेच्या ठिकाणापासून उठून गेले. तेथे त्यांना हिरवळीवर मरतुकडे घोडे चरत होते हे पाहून त्याच्यात आणि आपल्यात साम्य असल्याचा विचार तरळून गेला. आणि ते त्या घोड्याकडे पाठ करून चालू लागले सरळ मावळतीच्या क्षितीजाकडे.

या कथेत दोन पिढ्यांतील तफावत कलात्मक रीतीने चित्रित केली आहे. समाजात शिरलेला कृतघ्नपणा व मतलबीपणा या कथेत दिसून येतो.

९) इनवासे :-

'सुगरनचा खोपा' कथासंग्रहातील 'इनवासे' ही शेवटची कथा असून या कथेत ग्रामीण भागातील लोकांना एखादयाचं चांगलं झालेलं पाहवत नाही असाच प्रकार परबतरावांच्या पुतण्याच्याबाबतीत झाला. परबतराव कथेचा नायक. त्याच्या पुतण्याचं नांव गणेश. त्याच लग्न जमलं होतं त्यांचे व्याहीबुवा बँकेचे अध्यक्ष होते. गणेश महाविद्यालयात प्राध्यापक होता. त्यामुळे सगळा आनंदीआनंद होता. मुलगीही

दिसायला चांगली होती. पण त्यांना एक पत्र आलं की, नवरी मुलगी चांगल्या चालीची नाही. तिचं माझ्याशी लफडं होतं. असं सरळ पत्रात लिहिलं होतं पण नाव मात्र लिहिलं नव्हतं. परबतरावांनी ओळखलं की, हे पत्र गावातूनच कोणीतरी लिहिले आहे. आपली सोयरिक त्याला पाहवत नसेल म्हणून काहीतरी करून लग्न मोडायचे हा डाव त्यांच्या लक्षात आला. परबतरावांनी अनेक लग्नं ठरविली होती. त्यामुळे ते जराही डगमगले नाहीत उलट त्यांनी आपल्या भावाला समजावून सांगितले. त्यात गावात पार्टीशन वाढले होते त्यामुळे कोणीतरी कपटी माणसाने हे पत्र लिहिले असावे असे त्यांनी सांगितले. तसेच भुलूबाई ही विधवा बाई तिला भीमराव हा एकुलता एक मुलगा. त्याचही लग्न परबतरावांनी जमवलं होतं पण कोणीतरी पत्र पाठवून त्या मुलीला महारोग असल्याचे लिहिले होते. पण चौकशी केल्यानंतर समजले की, त्या मुलीला महारोग नव्हता. परबतरावांनी आपल्या भावाला हे उदाहरण देऊन समजावून सांगितले आणि ते गणेशला समजावयाला त्याच्या घरी गेले.

अशा प्रकारे ग्रामीण भागातील लोकांचे चित्रण, पार्टीशन असल्यानंतर कशा प्रकारचे वातावरण असते आपल्या विरूध्द पार्टीच्या लोकांना कधीही चांगले झालेले पाहवत नाही. जमलेली लग्न देखील मोडायला लोक तयार असतात पण या कथेचा नायक परबतराव ह्या ढासळत्या व्यवस्थेला टेकू देण्याचे काम करतो. त्याच्या रूपात हा आशेचा किरण या कथेत दाखविला आहे.

'सुगरनचा खोपा' ह्या कथासंग्रहातील सर्वच कथेतील नायक त्यांच्या त्यांच्या परीने आदर्श जीवन जगतात. इतरांच्या उपयोगी पडतात. किमान आपल्यापासून इतरांना त्रास होऊ नये ह्याची दक्षता घेतात. त्या सर्वांची स्वत:ची अशी वेगळी जीवनपध्दती आहे. तरी पराभूत होतात. त्यांच्या 'बिऱ्हाड' या कथेतील पंचफुला पाठीवर बिऱ्हाड घेऊन फिरते तर 'पेरणारे हात' मधील गुणवंतराव गरिबीमुळे नाडला जातो. त्याच्या शेतातील त्याने पेरलेले व कसलेले उभे पीक धोक्यात सापडते. 'लंगडा' या कथेतील घोड्याचे पिल्लू काहीही दोष नसता होरपळून निघते तर 'भिंगरी' कथेची

नायिका गंगाबाई मनावर चिंतेचे, भीतीचे व धसक्याचे कायम सावट पडून रात्रीबेरात्री धास्तावत फिरते. 'सुगरनचा खोपा' मधील गौतम लग्नासाठी उतावीळ झालेला, त्याच्या आशेला फुटलेला फुलोर चित्रित केला आहे. तर 'भोवांडा' कथेतील नायक शालक्या भुकेच्या वणव्यात वणवणतो व शेवटी मुंबईच्या गुंडागिरीची शिकार बनतो. 'धुईधानी' कथेतील साहेबराव भूमिपुत्राचा सुपुत्र पण जीवनातून उठविला जातो. सरळ-सरळ कुपुत्र ठरविला जातो. किडलेल्या समाजरचनेत भ्रष्टाचाराच्या वणव्यात तो खाक होतो. तर 'मावळती' कथेत समाजात शिरलेला कृतघ्नपणा व मतलबीपणा जरी दिसत असला तरी 'इनवासे' कथेत परबतरावाच्या रूपात ढासळत्या व्यवस्थेला टेकू देण्याचा प्रयत्न करणारा एखादा आशेचा किरण आहे.

प्रतिमा इंगोले यांनी आपल्या या कथासंग्रहात ग्रामीण भागातील स्त्रियांचे, पुरूषांचे, प्राण्यांचे चित्रण केले आहे. त्यांची सरळ ओघवती भाषा, तसेच म्हणी व वाक्प्रचारांचा भरपूर वापर करून त्यांनी कथा रोचक केल्या आहेत. ग्रामीण भागातील दु:खी कष्टी लोकांचे चित्रण त्या करतात. त्यांना आलेले अनुभव त्या कोणताही आडपडदा न ठेवता लिहितात.

अशा या प्रतिमा इंगोले ह्यांच्या 'सुगरनचा खोपा' कथासंग्रहाचे वाङ्मयीन मूल्यमापन पुढील प्रमाणे आहे.

**मुखपृष्ठ :-**

डॉ. प्रतिमा इंगोले यांनी कथासंग्रहाला 'सुगरनचा खोपा' हे दिलेले शीर्षक अतिशय समर्पक आहे. येवदयाचे केशव बोबडे यांनी या कथासंग्रहाला मुखपृष्ठ दिले आहे. ' 'सुगरणीचा खोपा' जर बारकाईने न्याहाळला तर त्यात सुबकता आहे, सुरक्षिततेची काळजी घेतलेली आहे. तसेच निवाऱ्याचा प्रश्न सोडविला आहे. एखाद्या कुशल वास्तुशास्त्रज्ञाने घर बांधावे तशी ही खोप्याची वीण दिसून येते. घट्ट आणि डौलदार! माणूसही स्वत:ला आयुष्यात जास्तीत जास्त सुरक्षित करण्याचा प्रयत्न करीत असतो. निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीचा उपयोग करून घेत स्वत:चे घरटे विणत

बसतो आणि स्वत:चे जगणे जगत असतो. त्यामुळे सुगरणीच्या खोप्याला जीवनाचे प्रतीक असे लेखिका म्हणते ते अतिशय अर्थपूर्ण आहे. जीवनाचे अनेक धागेदोरे त्यात सामावले आहेत.'[२]

'मुखपृष्ठावरील सुगरनचा खोपा नुसताच आकर्षक आणि सुंदर आहे. पण आतील कथांमधून व्यक्त झालेले जीवन संमिश्र असे वास्तवदर्शन घडवते! अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी चाललेला संघर्ष इथे आहे, पण निराशा नाही. आक्रमकतेपेक्षा सहज स्वीकाराकडे झुकलेली मानसिकता अधिक आहे.'[३]

या कथासंग्रहातील सर्वच कथा या कथासंग्रहाच्या शीर्षकाला योग्य अशाच आहेत. या कथासंग्रहात एकूण नऊ कथा आहेत.

**मलपृष्ठ :-**

''निवाऱ्याचा प्रश्न तरी कुठे यार सोपा असतो.

काटेरी बाभळीलाच सुगरनीचा खोपा असतो.''

'मनोगतात आणि मलपृष्ठावर आलेल्या या ओळी पुरेशा बोलक्या आहेत. 'काटेरी बाभळी म्हणजे संघर्ष आणि त्या संघर्षाला आव्हान देत झुलणारे जीवन म्हणजे सुगरनचा खोपा!' हे लेखिकेने केलेले स्पष्टीकरण या कथासंग्रहाच्या मुखपृष्ठातूनही व्यक्त व्हायला हवे होते.'[४]

**रेखाचित्रे :-**

या कथासंग्रहात एकूण नऊ रेखाचित्रे आहेत. या रेखाचित्रात प्रतिमा इंगोले यांनी झाडे, पक्षी, लहानमुली, देवस्थाने, झोपाळा यांचे रेखाचित्रण काढलेलं आहे. 'या संग्रहातील प्रत्येक कथेनंतर एक रेखाचित्र काढलेलं आहे. ही रेखाटनं स्वत: लेखिकेची आहेत. हातावरच्या मेंदीच्या नक्षीची आठवण करून देणारी ही रेखाटनं अस्सल मराठमोळी वळणाची आहेत. देशीयतेशी नाळ अदयाप जोडलेली आहे. याचं प्रतीक असलेली ही रेखाटनं ही या कथासंग्रहाची एक जमेची बाजू आहे.'[५]

ग्रामीण भागात जे जे दृश्य पहायला मिळते त्याचेच चित्रण या रेखाचित्रातून केले असल्याचे जाणवते.

**'सुगरनचा खोपा' तील स्त्री-चित्रण :-**

'सुगरनचा खोपा' या कथासंग्रहातील स्त्रियांचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी कलात्मक रूपात व्यक्त केले आहे. 'खेड्यातील स्त्री ही जागृत होत असली तरी ती पूर्णपणे जागृत झालेली नाही. शहरातील स्त्रीसारखी स्वत:च्या अधिकाराची, हक्काची जाणीव तिला झालेली आहे असे म्हणता येत नाही. ज्यांची शिक्षणांमुळे सुधारणा झालेली आहे अशा स्त्रियांचा ओढा हा खेड्याकडे नसतो. त्यामुळे साहजिकच बहुसंख्य कष्टकरी स्त्रियांच्या समस्याकडे दुर्लक्ष झालेले असते. आमच्या स्त्री सुसंघटना सुध्दा त्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचलेल्या नाहीत आणि म्हणून खेड्यातील स्त्री आपले परंपरागत काबाडकष्टाचे जिणे जगत, सासरच्या मंडळींचा, नातेवाईकांचा छळ, अत्याचार, अन्याय मुकाट्याने सहन करीत आहे व लुबाडल्या, फसविल्या जात आहे. परंतु एक ब्र काढण्यास सुध्दा ती समर्थ झालेली नाही अशा स्त्रियांच्या दु:खांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारांना प्रतिमा इंगोले यांनी वाचा फोडून मातीशी इमान राखले आहे.'[६]

' 'भिंगरी' आणि 'बिऱ्हाड' दोन्ही कथांत स्त्री व्यक्तिरेखा केंद्रवर्ती आहेत. अनुक्रमे गंगाबाई आणि पंचफुला यांची ही कहाणी आहे. सतत विस्कटत जाणाऱ्या संसाराला या दोघी सावरत असतात. घराच्या काळजीने दोघीही धास्तावलेल्या, घाबरलेल्या आहेत. पंचफुला मुलाच्या त्रासाने स्वत:चे घर सोडते आणि नवऱ्याला घेऊन आज इथे तर उद्या तिथे बिऱ्हाड मांडत असते. पोटासाठी कष्ट करण्याची तिची ताकद आहे पण तिला एका जागी कायमचा आसरा हवा आहे. त्यासाठी तिची वणवण चालू आहे. गंगाबाईला स्वत:चे घर असून ती बेघर झाल्यासारखी झाली आहे. शेजारचा चुलता दिवसेंदिवस इंच इंच अतिक्रमण करीत तिची हक्काची जागा बळकावतो आहे आणि पुन्हा वर तिच्या मुलांना जिवंत मारायला उठला आहे. कोर्ट कचेऱ्या,

पोलिस कुठेही तिला न्याय मिळत नाही. आजुबाजूचा समाज फक्त बघ्याची भूमिका घेतो आहे. बळी तो कान पिळी हेच सर्वत्र दिसून येते आहे. या सर्व प्रकारात गंगाबाईची अवस्था भिंगुळवाणी, सैरभैर झाली आहे.'[७] प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील स्त्रिया कष्ट करणाऱ्या, आलेल्या परिस्थितीला सामोऱ्या जाणाऱ्या आणि कधीही उदास न होणाऱ्या, आहे त्यात धन्यता मानणाऱ्या, वेगळे काहीतरी करून दाखविण्याची जिद्द असणाऱ्या आहेत. तसेच डॉक्टरीण, अध्यक्षांची पत्नी ह्या हुकूमत गाजवणाऱ्या स्त्रियांचे चित्रणही 'बिऱ्हाड' या कथेत केले आहे.

प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील स्त्रिया कधीही आक्रस्ताळेपणा करताना दिसत नाहीत. आपल्या वाट्याला आलेले दु:ख निमूटपणे सहन करीत बसतात. आपल्या संसाराची त्यांना सतत काळजी लागलेली असते. मुलाला दिलेल्या खुनाच्या धमकीमुळे गंगाबाई सतत चिंतेत राहते, रात्री-बेरात्री उठून घराकडे येते, सर्वजण झोपलेत हे पाहून पुन्हा माघारी जाते. तसेच 'सुगरनचा खोपा' कथेतील वकिलसाहेबांची पत्नी कोणी परका माणूस आला तर त्याला आपल्या घरात घेत नाही. अनोळखी माणसाला जशी वागणूक दिली जाते तशीच ती सुगरनचा खोपा मधील गौतमला देते.

'इनवासे' कथेतील भुलूबाईचे चित्रण अलिप्तपणे केले आहे. गावामध्ये एखादया मुलाचे किंवा मुलीचे लग्न ठरले तर ते कशा पध्दतीने मोडले जाते यासाठी भुलूबाईचे उदाहरण त्यांनी दिले आहे. एखादी स्त्री चांगली असेल तर तिचे वाईट कसे होईल हेच पाहिले जाते.

डॉ. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कथेत स्त्रीला कोठेच मोठेपणा दिला नाही. जे आहे, जसे आहे तसेच त्यांनी लिहिले आहे. त्यांना कथा लिहिताना कुठेही कल्पकता वापरावी लागली नाही. साधी, सरळ, सोपी आणि ओघवती भाषा त्यांनी कथा लिहिताना वापरली आहे. हेच त्यांच्या कथेचे वैशिष्टय होय.

**'सुगरनचा खोपा'मधील पुरूषचित्रण :-**

व्यक्ती तितक्या प्रवृत्ती याप्रमाणे प्रतिमा इंगोले यांनी 'सुगरनचा खोपा' या कथासंग्रहात पुरूषपात्रांचे चित्रण केलेले आहे. पांढरपेशा समाजातील लोक गरीब लोकांवर हुकूमत गाजवताना दिसतात. 'बिऱ्हाड' कथेतील डॉक्टर पंचफुलाला डॉक्टरीणबाईंना बोलली म्हणून माफी मागायला लावतात. पंचफुलाचा नवरा वय झाले तरी रात्रंदिवस राबतो, तरीही त्याला चार सुखाचे घास खाता येत नाहीत. तसेच 'पेरणारे हात' मधील गुणवंतराव शेतमजूर आहे. दुसऱ्यांच्या जमिनी लागवडीसाठी घेतो आणि त्यातच आपला चरितार्थ चालवितो. गुणवंतराव स्वभावाने प्रेमळ व मोठ्या मनाचा आहे. त्याने सावकाराकडून तीन वर्ष लागवडीसाठी शेत कागद करून घेतले होते. तिसऱ्या वर्षी तो हायब्रीड काढणार असतो. त्याचवेळी गावातील सावकार आणि त्याचे लोक येतात आणि हे शेत मी घेतले आहे आता मीच हायब्रीड काढणार असे म्हणतात त्यावर गुणवंतराव म्हणतो की, मी शेत पेरले तर ते मला खाऊ दया. तुम्ही शेत विकत घेतले पीक तर विकत घेतले नाही ना? गुणवंतराव असे म्हणताच सावकाराचे लोक त्याला बदडून काढतात. म्हणून तो वकिलाकडे न्याय मागण्यासाठी येतो. पण गुणवंतरावाला न्याय मिळेल काय? असा प्रश्न प्रतिमा इंगोलेंनी मांडून वाचकांवरच ती जबाबदारी सोपविली आहे.

'भिंगरी' कथेतील गंगाबाईचा चुलता हा श्रीमंत आहे. त्याला तीन मुले आहेत. तिघेही नोकरी, व्यवसाय करतात. तर गंगाबाईची मुले एक कारकून व दुसरा ग्रुप सेक्रेटरी आहे. हया दोघांनाही दारूची आकाबाई बिलगली होती. त्यामुळे त्यांचा संसार चालत नव्हता. चुलता मात्र त्यांच्या जागेत माडीचे घर बांधतो, त्यांच्यासाठी चार फूटच जागा ठेवतो. वरून जे पाणी पडते ते सरळ गंगाबाईच्या घरात व अंगणात जाते. गंगाबाईच्या मुलांनी भांडण काढले तर त्यांनाच बेदम मारहाण करतो आणि कोर्टात न्यायही आपल्याच बाजूने मिळवतो. गरीब लोक आपल्या हक्कासाठी झगडत असतील तर त्यांना न्याय मिळत नाहीच. उलट त्यांचाच पैसा फुकट खर्च होतो. श्रीमंत

लोकांना पैसा कितीही खर्च झाला तरी त्याचे काहीच वाटत नाही. मात्र त्यांना त्यांच्या पूर्वजांचा उद्धार केलेलाही सहन होत नाही. उलट गरिबांनी जर आपली तक्रार पोलिस स्टेशनमध्ये दाखल केली तरी पोलिस लोक त्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात. सगळीकडे भ्रष्टाचार होताना आपल्या नजरेस दिसतो.

'सुगरनचा खोपा'मधील गौतम हा अजाबराव पाटलांच्याकडे घरकाम व शेतकाम करीत असतो. त्याचे लग्न करायचे असते म्हणून तो मुलगी पाहण्यासाठी जातो तर सिनेमाच पाहून येतो. अजाबराव पाटलांनी मुलगी घरचीच आहे असे म्हणताच उतावीळ गौतम लगेच मुलगी पाहण्यासाठी अजाबराव पाटलांच्या पाहुण्यांकडे जातो. मुलगी पसंत पडते. तो मनातल्या मनात सुगरनचा खोपा तयार करतो. या कथेत तरूण मनाचे चित्रण केले आहे.

'भोवांडा' या कथेत शालक्या व परल्या यांचे चित्रण केले आहे. शालक्या मुंबईच्या गुंडांच्या गुंडगिरीची शिकार बनतो. भुकेच्या वणव्यात अडकलेला शालक्या मुंबईच्या झगमगत्या दुनियेत फसतच जातो त्याला बाहेर येण्याचा मार्गच सापडत नाही. त्याने लग्नही केले नव्हते मात्र परल्या आपल्याच गावी सुखी संसार करीत होता. त्याने जमिनीचा तुकडा विकत घेतला आणि त्यात शेती करतो. मात्र शालक्याचे जीवन उध्वस्त होते. समाजात वाढलेला भ्रष्टाचार आणि ग्रामीण भागातील लोकांना मुंबईचे वाटणारे आकर्षण, बाहेरून दिसणारी मुंबई आणि आतून असणारी मुंबई याचे वास्तव चित्रण या कथेत केले आहे.

'धुईधानी' कथेतील साहेबराव हा कास्तकाराचा मुलगा, त्याला लहानपणापासून शेतीची आवड होती. कापूस हे त्याच आवडतं पीक. त्याने स्वत: शेतात कष्ट केल्यामुळे त्याला शेतकऱ्यांच्या घामाचे मोल माहिती होते. म्हणूनच तो कापूस एकाधिकार योजनेत तोलाई कारकून म्हणून रूजू झाला. तेथील लोकांचा भ्रष्टाचार त्याला पाहवत नव्हता. पण तेथील अधिकारी लोकच त्याला कापसाचे पैसे खाल्ले म्हणून पुराव्यानिशी दाखवून देतात, त्याला अटक होते. साहेबरावाच्या

जीवनाचीच धुईधानी  हे वरिष्ठ अधिकारी करतात. बदलत्या समाजव्यवस्थेचे चित्रण या कथेत येते. गरीब अधिक गरीब होतो आहे तर श्र ीमंत अधिक श्रीमंत होत आहे. शेतकऱ्याच्या मालाला बाजारात किंमत दिली जात नाही आपणच जर त्याच्या मालाला किंमत दिली नाही तर शेतकरी राजा कसा सुधारेल, आपला भारत देश सुजलाम् सुफलाम् कधीही होऊ शकणार नाही.

तसेच 'मावळती' कथेत बाबासाहेब हे वृध्द आहेत. बाबासाहेब हे त्यांच्या गावचे आदय नेते होते. त्यांच्या मुलाचा जि.प. चा सदस्य  झाला म्हणून सत्कार आयोजित केला होता. म्हणून ते दोघेही गावी येतात. तेव्हा सत्काराच्या वेळेस बाबासाहेबांच्या मनात परकेपणाची भावना निर्माण होते. कारण त्यांनी त्या गावासाठी जे कार्य केले होते त्याचा विसर इथल्या लोकांना पडला होता. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांचाही विचार केला नाही त्या काळातील लोकांना आजच्या पिढीतील लोक विसरत चालले आहेत. काळ जसा बदलतो आहे तशीच ही नवीन पिढीही बदलत आहे. दोन पिढ्यांमधील तफावत बाबासाहेबांच्या रूपाने या कथेत वर्णन केली आहे.

'इनवासे' कथेतील परबतराव हे ढासळत्या समाजव्यवस्थेला टेकू देण्याचे प्रयत्न करतात. त्यांच्या रूपाने एक आशेचा किरण ह्या समाजव्यवस्थेत आहे म्हणून ही समाजव्यवस्था टिकून आहे असे प्रतिमा इंगोले यांनी या कथेत वर्णन केले आहे. ग्रामीण भागातील टगी, बेरकी, इरसाल, कष्टकरी लोकांचे चित्रण प्रतिमा इंगोले आपल्या कथासंग्रहात करतात.

विविध वृत्ती, प्रवृत्तींच्या लोकांचे चित्रण इंगोले करतात. शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना सहृदयतेने मांडल्या आहेत. तसेच वरिष्ठ लोक गरीब लोकांना कसे फसवतात व भ्रष्टाचार समाजात कसा वाढीस लावतात याचे सुरेख चित्रण प्रतिमा इंगोले यांनी केले आहे.

**मुक्या प्राण्यांचे चित्रण :-**

ग्रामीण जीवनात प्राण्यांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्यामुळे आपल्याला खूप फायदा होतो. शेतीला पूरक म्हणून पशुपालन हा व्यवसाय केला जातो. घोडा, कुत्रा, बैल, म्हैस, गाय, शेळी इ. प्राण्यांपासून आपल्याला विविध प्रकारचे फायदे होत असतात. काही ठिकाणी प्राण्यांची पूजाही केली जाते तर काही ठिकाणी प्राण्यांचा अमानुष छळ केला जातो. अशाच प्रकारचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी आपल्या 'लंगडा' या कथेत करून एका जखमी घोड्याच्या पिलाच्या वेदना शब्दबध्द केल्या आहेत. मुके प्राणी बोलू शकत नाहीत. त्यांना आपल्यासारखी बोलता येणारी पुरूष जात संताप आल्यानंतर कशा पध्दतीने मारहाण करतात, तसेच बदला घेण्यासाठी त्यांनी मालकाला मारायच्याऐवजी ते सगळा राग त्या छोट्या घोड्याच्या पिलावर काढतात. त्याला इतके मारतात की त्याच्या पायाचे हाड बाहेर येते त्यामुळे त्याला आपले दोन्ही पाय गमावून बसावे लागते. त्याच्या फिरायच्या, खेळायच्या वयातच त्याचे दोन्ही पाय कापले जातात. अशी क्रूर पुरूषजात स्वत:चा सूड उगवण्यासाठी असहाय्य प्राण्यांनाही बळी पाडतात. तसेच 'पेरणारे हात' या कथेत गुणवंतराव आपल्या बैलजोडीचा उल्लेख करतो. गरीब शेतकऱ्यांच्या जीवनाचा आसरा असणारे हे बैल त्यांच्यामुळेच ते सर्व काम करून घेतात. त्यांची जोपासना करतात.

प्रतिमा इंगोले यांनी आपल्या या कथासंग्रहामध्ये फक्त दोनच कथांमध्ये मुक्या प्राण्यांचे चित्रण केले आहे.

**ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण :-**

'मराठी साहित्याच्या क्षेत्रात ग्रामीण कथा एक स्वतंत्र अस्तित्व बाळगून आहे. ग्रामीण क्षेत्रात प्रमुख असणारा शेती व्यवसाय, तिथल्या मातीवर प्रेम करणारी भाबडी माणसं, खेड्यात शिरलेले राजकारण, तेथील रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, तेथे दिसून येणारी स्पृश्यास्पृश्यातील तेढ, जमिनीबद्दल इस्टेटीबद्दल असणारी भाऊबंदकी, गावातील बेरकी-राजकारणी मंडळी, त्यांनी हाताशी धरलेले गावगुंड, तेथे असणाऱ्या

शाळांचे वास्तवचित्रण, खेड्यातील लोकांची शिक्षणाकडे हळूहळू वाढत चाललेली ओढ, शेतीतील कष्टकरी मजुरांच्या सुखदु:खाचे चित्रण, त्यांच्या जीवनात घडणारे क्वचित कडू-गोड प्रसंग, ग्रामीण क्षेत्रात दिसून येणारे जनावरांवरील प्रेम इ. विषय घेऊन ग्रामीण कथाकार ग्रामीण वातावरणाचे चित्रण समर्थपणे रेखाटत आहे. अशाच ग्रामीण कथालेखकांपैकी सौ. प्रतिमा इंगोले या आहेत.'[८]

'१९८९ ला प्रकाशित झालेल्या ह्या संग्रहात एकूण नऊ ग्रामीण कथा असून या सर्व कथा ग्रामीण समाजातील विभिन्न समस्या व भावनिक आंदोलनांना कवेत घेणाऱ्या आहेत. यापूर्वीच्या कथेत आढळणारा एक आणि एकच असा सूर या संग्रहातील कथांमध्ये जाणवत नाही तर ग्रामीण समाजाच्या भावविश्वातील अनेक कंगोऱ्यांना स्पर्श करीत समकालीन वास्तवाचं अत्यंत संयमी असे चित्रण या कथा करतात.'[९] डॉ. सौ. प्रतिमा इंगोले ह्या कथासंग्रह लिहिताना स्वत:ला अलिप्त ठेवतात. या कथासंग्रहात ग्रामीण भागातील लोकांची सुख-दु:खे, वेदना यांचे चित्रण केले आहे. मुक्या प्राण्यांचेही चित्रण इंगोलेंनी केले आहे. ' 'सुगरनचा खोपा' या कथासंग्रहात एकूण नऊ कथा आहेत. या सर्वच कथांमधून सर्वप्रथम जाणवते ते हे की, त्यांची ही कथा वास्तवाच्या पातळीवरून ग्रामीण माणसाच्या मनाचा प्रामाणिक शोध घेणारी वैदर्भी कथा आहे. ही कथा सामान्य ग्रामीण माणसाची असामान्य कथा आहे असेही आपण म्हणू शकतो. कारण या कथासंग्रहात आपल्याला भेटणारी माणसं पंचफुला (बिऱ्हाड), गुणवंतराव (पेरणारे हात), गंगाबाई (भिंगरी), गौतम (सुगरनचा खोपा), साहेबराव (धुईधानी), बाबासाहेब (मावळती), परबती (इनवासे) ही सर्व ग्रामीण मानसिकता असलेली, ग्रामीण जीवनात जगणारी माणसे आहेत. ही सर्व माणसे परिस्थितीला शरण जातात. तशी ही माणसे परिस्थितीशी संघर्षही करतात. प्रचंड दारिद्र्याच्या खाईत असणारी ही माणसे माणूसकी जपणारी, कर्तव्याला जागणारी, कुढत न बसता जीवनाला चिवटपणे सामोरी जाणारी, नेकीने, इमानदारीने जगून मनाची श्रीमंती जपणारी, मायाळू आणि सत्याची चाड बाळगणारी आहेत. म्हणूनच ही माणसे सामान्य

असली तरी त्यांच्या जीवनाची कथा मात्र असामान्य झालेली आहे.'[१०] ग्रामीण स्त्री-पुरूष आणि त्यांच्या लौकिक जीवनातील, भावजीवनातील दु:खे आणि व्यथा-वेदना प्रतिमा इंगोले यांनी मांडल्या आहेत.

'ग्रामीण जीवनातील सामान्यांच्या दु:खाचा आविष्कार इथं अधिक प्रमाणात दिसतो. अशिक्षित, दरिद्री माणसांची तथाकथित सुशिक्षित पण मतलबी स्वार्थी माणसांनी केलेली फसवणूक लेखिकेला कथांतून मांडावीशी वाटते. चुलत्याशी आपल्या घरासंबंधी झालेल्या भांडणातून वैतागलेली गंगाबाई हतबल होते कारण तिचं अडाणीपण आणि त्यातून आलेलं नाकर्तेपण हे चित्रण आपल्याला अस्वस्थ करतं. गरिबीपोटी ज्यांनी कायदा सांभाळायचा त्या पोलिसी यंत्रणाही कशा निरूपयोगी ठरतात ह्याचं प्रभावी चित्र ह्या कथेत उमटतं. 'पेरणारे हात' किंवा 'बिऱ्हाड' सारख्या कथांमध्येही अशी कष्टकरी आणि समाजाकडून अवहेलना, फसवूणक झालेली माणसं आपल्याला भेटतात. 'सुगरनचा खोपा' सारखी एखादी कथा तरूण मनाच्या स्वप्नांचं वेधक दर्शनही घडवतात.'[११]

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या या कथासंग्रहात ग्रामीण संस्कृतीचे आणि तेथील इरसाल माणसे, भोळी माणसे, सोशिक स्त्रिया यांचे मनोज्ञ दर्शन घडविले आहे. तसेच आज शेतीव्यवसायाला आलेले अवकळेचे दिवस, खेड्यातील ढासळती अर्थव्यवस्था यांचे दर्शनही त्यांच्या कथातून घडते. तसेच दु:खी, कष्टी लोकांचे चित्रण वास्तवाच्या पातळीवर केले आहे. ग्रामीण स्त्री-पुरूष, वृध्द, तरूण तरूणी यांचे सुबक असे वर्णन करतात. कथानकाची रेखीव मांडणी, बांधणी, आशयसंपन्नता, सहजसुंदर ओघवती भाषा आणि पात्रांमधील संवाद तसेच वास्तव वातावरण यामुळे या कथासंग्रहातील कथा ग्रामीण जीवनाचे अस्सल दर्शन घडवितात.

**म्हणी व वाक्प्रचारांचा यथायोग्य वापर :-**

प्रतिमा इंगोले यांनी आपल्या या कथासंग्रहात म्हणींचा यथायोग्य वापर करून कथा अधिक जिवंत व कलात्मक स्वरूपात चित्रण केल्या आहेत. त्यांच्या या कथासंग्रहातील म्हणी पुढील प्रमाणे -

१) इचवाचं बिऱ्हाड आपलं पाठीवर हाये. (बिऱ्हाड, पृ. १५)

२) अळजीब खाये अन् पळजीब वाट पाहे. (भिंगरी, पृ. ४५)

३) डोंगर जयते जन पायते पन मन जयते कोन पायते (भिंगरी, पृ. ४५)

४) माय म्हणे लेक झाला आणि भाऊ म्हणे वैरी झाला. (भिंगरी, पृ. ४५)

५) गरीब देवा लाथा मार खनतळ देवा नमस्कार. (भिंगरी, पृ. ४६)

६) मोठ्याला आला गाळा आणि गरिबाचं झोपळं मोळा. (भिंगरी, पृ. ४६)

७) खात्याला निखाते सहन होत नाही. (भिंगरी, पृ. ४९)

८) अकातली गाय काटे खाय. (भिंगरी पृ. ५६)

९) बाराभाई खाती आन् काई ना लागे हाती (धुईधानी, पृ. ७९)

१०) आयजीच्या जीवावर बायजी उदार (धुईधानी, पृ. ८३)

११) एका हातानं टाळी वाजत नाही. (धुईधानी, पृ. ८४)

१२) आजकाल चलतीचेच ढोल सर्व वाजवतात. (मावळती, पृ. ८९)

१३) जीब उचलाले आन टाळूले लावाले काय जाते कोनाले? (इनवासे, पृ. ९७)

तसेच प्रतिमा इंगोलेंनी 'सुगरनचा खोपा' या कथासंग्रहात वाक्प्रचारांचा वापर करून कथेला अधिक परिणामकारक बनविले आहे. त्यांच्या या कथासंग्रहातील वाक्प्रचार पुढीलप्रमाणे आहेत.

१) चिमणीच्या खेपा (पृ. १४), २) बुडत्याला काडीचा आधार (पृ. १९), ३) कांदयाचे भाव गगनात गेले (पृ. २७), ४) पान्याने 'खो' दिला (पृ. २९), ५) अंतर्मुख होणे (पृ. ३१), ६) जीवाचा कातोळा करणे (पृ. ४५), ७) भांडण विकत घेणे (पृ. ४५), ८) नीतिमत्ता धाब्यावर बसविणे (पृ. ४६), ९) काळीज सुपभर होणे (पृ. ४७),

१०) पारा चढणे (पृ. ५२), ११) भित्यासाठी ब्रम्हहत्या (पृ. ५४), १२) भुरळ घालणे (पृ. ७५), १३) भोवांडा पसरणे (पृ. ७७), १४) दुधाची तहान ताकावर भागविणे (पृ. ८०), १५) मुंगलाई येणे (पृ. ८१), १६) घामाचे मोल जाणणे (पृ. ८५), १७) कलंकित करणे (पृ. ८७), १८) रंगेहाथ पकडणे (पृ. ८६), १९) उदो उदो करणे (पृ. ९४), २०) जीव तोडून प्रयत्न करणे (पृ. १०३)

ग्रामीण भागातील अस्सल भाषेचा वापर करून वाक्प्रचारांचाही यथायोग्य वापर इंगोलेंनी केला आहे.

तसेच प्रा. गणेश देशमुख म्हणतात, 'अस्सल वऱ्हाडी बोलीतील म्हणी व वाक्प्रचार यांचा सुयोग्य वापर कथेतील वर्ण्य विषयांना अधिक परिणामकारक व प्रत्ययकारी करून जातो. प्रत्येक कथेत अशा अनेक म्हणी व वाक्प्रचार तथा खास वऱ्हाडी शब्द कथेला अधिक परिणामकारक करतात. उदा. 'खेळ्याची वस्ती आन् दाय खाय निस्ती' (पृ. १९), 'सगळं ठेवावं पोटी आन् गोड बोलावं ओठी' (पृ. ३९), 'आकाबाई मांग अन् दीड पैसा संग'(पृ. ३२), 'अळात गुळ आन् झाळालेच कानोले' (पृ. ७०), 'होये ना जीवा करे लोकांचा हेवा' (पृ. ७९), 'हेला गाभन तेरावा मयना' (पृ. ३८), 'भोंड येणे'(पृ. ५५), 'पारा चढणे' (पृ. ३६), 'घोयखोशीवर येणे' (पृ. २५) इ. वाक्प्रचारांच्या समृध्द वापरामुळे कथानुभव अधिक आशयघन होतो.

'दुःखाच्या लाटा' (पृ. २६), 'विव्हल दान'(पृ. २९), 'मूक आक्रंदन' (पृ. ३०), 'गरगरता भोवांडा' (पृ. ५७), 'उपेक्षितपणाची लाट' (पृ. ३९) इ. प्रतिमा लक्षवेधक वाटतात. कुळशील (पृ. ७३), खाचाखोचा (पृ. ७६), भगरभगर (पृ. ७०), गळत-चिळत (पृ. ३६), हालगो-मलगो (पृ. ५७) इ. भाषिक रूपे व इचकणे, गाभन, सुगड्या, आंधण (पाण्याचे), घाटाघुगरी, डाखळा, कल्ला, धुईधानी, इनवासे इ. कितीतरी देशी शब्दाबरोबरच क्वचित इंग्रजी व हिंदी शब्दांचाही वापर लेखिकेने केलेला आहे. तो कथेतील अनुभवविश्वाला अस्सल ग्रामीणत्व प्रदान करतो.'[१२]

**'सुगरनचा खोपा' मधील संवाद :-**

प्रतिमा इंगोले यांच्या भाषेतील सहजसुंदर संवाद वाचताना त्यातील लय जाणवते. त्यांच्या पात्रांच्या तोंडी सहजसुंदर नैसर्गिक संवाद आहेत असेच वाटते. 'अशा या खेड्यातील पार्श्वभूमी असलेल्या वेगवेगळ्या विषयांवरच्या नऊ कथा या संग्रहात आहेत. वऱ्हाडी बोलीतींल आकर्षक संवाद हे सर्वच कथांचं बलस्थान आहे. या भाषेला एक गोडवा आहे. काही ठिकाणी तर ती काव्यमय वाटते. 'ड' ऐवजी 'ळ' (पडलो-पळतो), 'ही' ऐवजी 'ई' (काही-काई) अशी मृदू अक्षर आल्यामुळे ही भाषा मृदू वाटते. 'सुगरनचा खोपा' ही कथा या भाषेच्या दृष्टीनंही वाचण्यासारखी आहेत.

या भाषेतले सहजसुंदर संवाद वाचतानाही त्यातली लय जाणवते. उदा. 'लगन करते काय तुहाबाप अवंदा तुय?'

काय जन बुवा?

काय जन बुवा काय? तरीच तो पोरी पाहून राहयला. पण तयाते म्हणा, आंदी मले तं सांगा लागत होतं ! अरे पोरगी आपल्या घरीच आहे.'

'गरिबाले चिळोता अण्णा तुम्ही!'(पान ५७) असे हे संवाद हे या कथांचे खास वैशिष्टय आहे.'[१३]

तसेच 'भिंगरी' कथेतील संवाद वाचण्यासारखा आहे तो असा -

'कुठी हाये तो कमीन डोक्शाचा? त्याला म्हणा बाहीर ये. त्याले पुसतो का आमच्या रिपेरीनं तुयी जागा झिजते काय?' तशी ती मध्ये पडली चुलत्याला, भावाला समजावू लागली -

'बापा! लेकरू हाये ते त्याले काय समजते? तुम्ही रिपेरी करा. मी तुमाले हो म्हनतो.' (पृ. ५१)

अशा प्रकारे एकापेक्षा एक सरस असे संवाद प्रतिमा इंगोले यांनी शब्दबध्द केले आहेत. वऱ्हाडी बोलीतील हे संवाद त्यांच्या कथांचे मुख्य वैशिष्टय ठरतात.

**'सुगरनचा खोपा' मधील भाषाशैली :-**

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांच्या कथासंग्रहातील एकूण नऊ कथांची भाषा साधी, सरळ, ओघवती आहे. तिच्यात कुठेही फाफटपसारा नाही. विदर्भातील वऱ्हाडी भाषेच्या वापरामुळे त्यातील नैसर्गिकपणा आणखीनच जाणवतो. त्यांची भाषाशैली अतिशय मृदू वाटते. वऱ्हाडी भाषेचा वापर करताना त्यांनी 'ड' ऐवजी 'ळ' (पडलो-पळतो), 'ही' ऐवजी 'ई' (काही-काई), 'ढ' ऐवजी 'ळ' (पुढे-पुळे), 'ण' ऐवजी 'न' (पण-पन), 'वी' ऐवजी 'इ' (विकले-इकले), 'ह' ऐवजी 'य' (राहते-रायते) असे शब्द वापरले आहेत.

तसेच 'धसकाफुसकी' (पृ. १८), 'चटचटू' (पृ. १९), 'ओकीबोकी' (पृ. १९), 'झाम्बळ झुम्बळ' (पृ. २८), 'पानमान' (पृ. २८), 'नांगरन, गिंगरन' (पृ. ३२), 'हरबरा-भरबरा (पृ. ३३), 'सायबागियबाले' (पृ. ३४), 'झाम्बड-झुम्बड' (पृ. ७२), 'लगनगिगन' (पृ. ७४), 'फिट्टफाट' (पृ. ८४), 'जोळाघोळा' (पृ. ९७) अशा प्रकारचे शब्द या कथासंग्रहात वापरण्यात आल्यामुळे यातील कथांची गोडी, आणखीनच वाढली आहे. वऱ्हाडी बोलीतील दीर्घ स्वरांच्या ठिकाणी ऱ्हस्व स्वर वापरल्यामुळे कथा अधिक रोचक बनली आहे.

'लेखिकेची भाषा साधी, सोपी, वेधक आहे. त्यात भर पडते ती आकर्षक संवादांची. ह्या कथांमधले संवाद बरोबरीच लक्षणीय आहेत. ते विषयांमधला साधेपणा, सरळपणा तर जपतातच पण कथेचं रंजकमूल्यही वाढवतात. हे संवादही बहुतांशी वऱ्हाडी बोलीत आहेत. त्यामुळे भाषेतला गोडवा संवादात आपोआप उतरतो. ग्रामीण भाषेशी चांगला परिचय असल्यानं 'भोवांडा', 'धुईधानी', 'इनवासे' असे शब्द आणि 'अळजीब खाये अन् पळजीब वाट पाये', 'बारा भाई खेती अन् काई ना लागे हाती' असे वाक्प्रचार, म्हणी आपल्याला जागोजाग आढळतात. त्यानं निवेदनातील अर्थगर्भता वाढते.'[१४]

प्रतिमा इंगोले यांच्या वैदर्भी बोलीभाषेमुळे या संग्रहाला दर्जेदारपणा आला आहे तसेच वऱ्हाडी माणसाबद्दल आणि परिसराबद्दल आस्था असल्यामुळे लेखिकेने आपली

निवेदनशैली प्रभावीपणे मांडली आहे. त्यांच्या कथेची भाषा संमिश्र आहे. त्या प्रमाणभाषेचा वापर करतात. तरीही वऱ्हाडी भाषेचेच प्रभुत्व जास्त दिसून येते.

**'सुगरनचा खोपा' मधील निसर्गचित्रण :-**

'सुगरनचा खोपा' या कथासंग्रहात निसर्गचित्रण फारच थोड्या प्रमाणात करण्यात आलेले आहे. प्रतिमा इंगोलेंनी निसर्गापेक्षा 'माणसा'ला आपल्या कथेचा केंद्रबिंदू मानले आहे. निसर्गचित्रण करताना त्यांनी 'फाल्गुन महिन्याचे' चित्रण अतिशय वेधक केले आहे.

''नुकतीच होळी धडाधड पेटून विझली होती. पण तिनं वातावरणाला पेटायचं वाण दिलं होतं. फाल्गुनातलं वातावरण पेटू पेटू तापू लागलं होतं. बहुतेक झाडांची पानं गळल्यामुळे फांदयांचे सांगाडे ओकेबोके वाटत होते त्यात उन्हाची काहिली उदासिनता पसरवत होती.'' (पृ. १२)

निसर्गाचे वर्णन इंगोले एखादया वाक्यानेच करतात, ''दिवस मावळू लागला तशी ती परतली'' (पृ. १४), 'संध्याकाळ गडद होऊ लागली मोकळ्या आभाळात पाखरांचे थवे पांगू लागले.' (पृ. १४), 'सगळीकडे ऊन चटचटू लागायचं' (पृ. १९). झाडाला पालवी फुटायला लागल्याचे वर्णन त्या अतिशय मोहक करतात.

'सृष्टीला नवलाईचे वेध लागू लागले होते. नव्या वर्षाच्या स्वागताला नवे नवे अंकूर जागोजागी फुटू पहात होते. औदुंबरालाही कोवळी पालवी उमलली होती. पहाता पहाता ओकीबोकी वृक्षराई हिरवळू लागली होती. सृष्टीचा उदासीनपणा तोंड लपवून पळाला होता. एवढ्या उन्हातही ती दमदार दिसू लागली होती. गुढीपाडवा चार-दोन दिवसांवर येऊन ठेपला होता' (पृ. १९, २०)

'सुगरनचा खोपा मजेत झुलतच होता. वाऱ्याबरोबर हिंदकळत होता.' (पृ.६६)

'मावळती' कथेत बाबासाहेबांचे वर्णन करताना -

'आता सूर्य मावळतीकडे झुकला होता.' (पृ. ९५)

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या या कथासंग्रहात निसर्गाचे फारच थोडे चित्रण केल्याचे दिसते.

**'सुगरनचा खोपा' मधील उपमा :-**

'सुगरनचा खोपा' या कथासंग्रहामध्ये प्रतिमा इंगोले यांनी उपमांचा वापर केल्याचे दिसून येते. उदा. 'वासराच्या कानात वारं शिरावं तसं त्याच्या डोळ्यात वारं भरलं होतं.' (पृ. ३७), 'कापूस वेचल्यानंतर सुन्या होणाऱ्या, काडीगत दिसणाऱ्या संपूर्ण वाळलेल्या पऱ्हाटीसारखा तो दिसू लागला.' (पृ. ६६) इ. दीर्घ उपमा घटना अथवा मन:स्थितीचे नेमके चित्र आपल्यापुढे उभे करतात.'[१५]

**'सुगरनचा खोपा' मधील प्रतिमांचा वापर :-**

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या 'या कथांमधून आलेल्या वर्णनातील काही प्रतिमा त्या वर्णनाची परिणामकारकता वाढवणाऱ्या आहेत. उदा. 'मावळती' या कथेत 'पुन्हा आपल्या मनासाठी ऐटदार व डौलदार जोमाचा कोट शिवू लागले.'

'भोवांडा' या कथेत 'पोटातील भुकेचं आता वणव्यात रूपांतर झालं होतं' किंवा 'सुगरनचा खोपा' या कथेत 'कापूस फुटलेल्या वावराच्या मालकासारखी त्याला वेगळीच काळजी लागली.'[१६]

प्रतिमांचा वापर करताना लेखिकेची प्रगल्भता दिसून येते.

**'सुगरनचा खोपा' मधील उणीवा :-**

'सुगरनचा खोपा' या कथासंग्रहात लेखिकेच्या लेखनामध्ये काही उणीवाही आढळतात. 'काही ठिकाणी म्हणींची पुनरावृत्ती झाल्यासारखी वाटते. (त्यांच्या इतर संग्रहांच्या वाचनानंतर ती अधिक जाणवते.) काही ठिकाणी कारण नसताना प्रमाण मराठीचा अतिरेकी वापर मूळ अनुभवाच्या आविष्कारात व प्रत्ययात अडसर निर्माण करतो. उदा. 'बिऱ्हाड' ही अस्सल ग्रामीण कथा आहे, त्यात सुगृहीणीसारखं पंचफुला घरकूल सजविते. (पृ. ८), भांडे घासण्याच्या कामगिरीवर निघते (पृ.९) याशिवाय जीवनोपयोगी कामं वगैरे उल्लेख मूळ अनुभवाच्या गडद आविष्कारात अडसर ठरतात.

दुसरे म्हणजे बऱ्याच कथा ह्या निवेदनाच्या पातळीपर्यंत येऊन पोहोचतात. त्या आविष्कारशील होणे आवश्यक वाटते. 'बिऱ्हाड', 'लंगडा', 'पेरणारे हात' मध्ये जाणवते. उलट 'सुगरनचा खोपा', 'मावळती' इ. कथा अधिक उत्कट वाटतात. लेखिकेकडे अस्सल ग्रामीण अनुभवविश्व व प्रतिमा असल्याचा प्रत्यय देणाऱ्या त्या कथा आहेत. त्यामुळे मग केवळ सहानुभूतीने अथवा केवळ भाषिक वैशिष्टयांच्या जोरावर कोणत्याही घटना प्रसंगाना कथारूप देण्याचा मोह टाळणेच श्रेयस्कर ठरेल. कथेतील तपशीलाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.'[१७]

प्रतिमा इंगोलेंच्या कथा वाचताना काही काही शब्द अडखळतात. तसेच त्या शब्दाचा अर्थ वैयक्तिकपणे काढत बसले तर काही शब्द आकलनाच्या पलीकडचे असतात. परंतु वाक्य पूर्ण वाचल्यानंतर त्या वाक्याचा अर्थ लक्षात येतो. तरीही लेखिकेने प्रादेशिक भाषा व प्रमाणभाषा यांचे इष्ट संतुलन ठेवणे गरजेचे आहे.

**समारोप :-**

अशा प्रकारे प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरनचा खोपा' या कथासंग्रहात एकूण नऊ कथांचा समावेश असून या कथांमधून त्यांनी अनेक विषय हाताळले आहे हे लक्षात येते. ग्रामीण जीवनातील वैविध्यपूर्णता त्या वेगवेगळ्या कथांमधून स्पष्ट करतात. तसेच त्यांची ओघवती भाषाशैली, सहजसुंदर संवाद, म्हणी आणि वाक्यप्रचारांचा यथायोग्य असा वापर त्यांनी आपल्या कथेत केला आहे. निसर्गाचे थोडेच पण वेधक असे चित्रण केले आहे. त्यांच्या कथांमधील पात्रे वाचताना जिवंत स्वरूपात नजरेसमोर येतात. त्यांच्यामधील संवाद नैसर्गिक वाटतो. कुठेही कृत्रिमता दिसत नाही. वऱ्हाडी बोलीमुळे कथा अधिक मृदू व विलोभनीय वाटतात. त्यांच्या कथांमधील पात्रांच्या तोंडचे संवाद त्यांच्या कथांचे खास वैशिष्टय वाटते. कथानकाची रेखीव बांधणी, साधी, सोपी भाषा आणि छोटी छोटी वाक्ये बोलीभाषेशी जवळीक साधणारी आहेत.

पुढील प्रकरणात आपण 'लेक भुईची' पुस्तकाचा परिचय व वाङ्मयीन मूल्यमापन पाहणार आहोत.

**संदर्भ :-**


१) 'लोकसंस्कृती आणि स्त्रीजीवन', डॉ. प्रतिमा इंगोले, दिलीपराज प्रकाशन, प्रथम आवृत्ती ११ प्रपिल २००३,शाबासकी, उषा मा. देशमुख.

२) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, ग्रामीण समाजवास्तव शोधणाऱ्या कथा, ज्योत्स्ना आफळे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ७३.

३) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, संमिश्र वास्तवदर्शन, 'सुगरनचा खोपा', आसावरी काकडे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ६८.

४) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, संमिश्र वास्तवदर्शन, 'सुगरनचा खोपा', आसावरी काकडे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ६८.

५) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, संमिश्र वास्तवदर्शन, 'सुगरनचा खोपा', आसावरी काकडे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ६८.

६) 'दान्याचे मोल', सं. विमलाबाई कुकडे, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'अकसिदीचे दाने', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, वऱ्हाडी मातीची निर्मिती, 'अकसिदीचे दाने' एक दृष्टीकोन, डॉ. जयंतकुमार बंड काटोल, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती, ४-११-९५, पृ. ४३.

७) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, ग्रामीण समाजवास्तव शोधणाऱ्या कथा, ज्योत्स्ना आफळे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ७४.

८) 'दान्याचे मोल', सं. विमलाबाई कुकडे, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'अकसिदीचे दाने', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, वऱ्हाडी मातीची निर्मिती, 'अकसिदीचे दाने' एक दृष्टीकोन, डॉ. जयंतकुमार बंड, काटोल, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती. ४-११-९५, पृ. ४८.

९) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, वैचारिक भूमिका असणाऱ्या कथा, 'सुगरनचा खोपा', प्रा. गणेश देखमुख, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ४८.

१०) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, वास्तवाच्या पातळीवरून ग्रामीण माणसाच्या मनाचा प्रामाणिक शोध घेणारी कथा, 'सुगरनचा खोपा', फ.म. शहाजिंदे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. १४.

११) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, सामान्यांच्या सुख दुःखाच्या कथा, वीणा देव, (दै. महाराष्ट्र टाईम्स), सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. २८.

१२) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, वैचारिक भूमिका

असणाऱ्या कथा, 'सुगरनचा खोपा', प्रा. गणेश देखमुख, (आकाशवाणी पुणे यांच्या सौजन्याने), सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ५८.

१३) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, संमिश्र वास्तवदर्शन, 'सुगरनचा खोपा', आसावरी काकडे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ६६.

१४) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, सामान्यांच्या सुख दु:खाच्या कथा, वीणा देव, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. २८,२९.

१५) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, वैचारिक भूमिका असणाऱ्या कथा, 'सुगरनचा खोपा', प्रा. गणेश देखमुख, (आकाशवाणी पुणे यांच्या सौजन्याने), सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ५८,५९.

१६) 'खोप्याची वीण', सं. ॲड. पंजाबराव इंगोले, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सुगरणचा खोपा', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, संमिश्र वास्तवदर्शन, 'सुगरनचा खोपा', आसावरी काकडे, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९९, पृ. ६७.

१७) 'दान्याचे मोल', सं. विमलाबाई कुकडे, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'अकसिदीचे दाने', कथासंग्रहावरील परीक्षणात्मक लेख, 'अकसिदीचे दाने' काही हळदीचे काही असेच!!! प्रा. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, नागपूर, सोनल प्रकाशन, प्रथमावृत्ती, ४-११-१९९५, पृ. २५,२६.

***